# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. पदवीसाठी **''मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र ('सौंदर्य आणि साहित्य'च्या संदर्भात)''** या विषयावरील प्रबंधिका सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. या निमित्ताने ज्यांनी मला सहकार्य केले त्या सर्वांचे प्रती ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजते.

माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. कृष्णा किरवले यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजते. सरांचा सहवास, अफाट अभ्यास, त्यांची शिस्तबद्धता, अभ्यासामधील गांभीर्य यांसारख्या अनेक गोष्टीमधून मी खूप काही शिकले. गुरूवर्य डॉ. विश्वनाथ शिंदे सर, डॉ. रवींद्र ठाकूर सर, डॉ. रणधीर शिंदे सर तसेच हिमांशू स्मार्त सर यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन केले त्यामुळे मी त्यांची ऋणी आहे. आमच्या आर्टस् कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज मलकापूर येथील प्रा. संजय मेस्त्री सर व प्रा. टी.डी. पाटील सर यांनीही मला मोलाचे प्रोत्साहन दिले. त्यामुळे मी ही प्रबंधिका पूर्ण करू शकले.

याबरोबरच माझ्या मित्रपरिवाराबरोबर केलेली चर्चा आणि माझा वाढवलेला विश्वास हे सर्व माझ्या प्रबंधिका पूर्णत्वाच्या कार्यास महत्त्वपूर्ण ठरले.

ज्यांनी उन्हातान्हाची तमा न बाळगता माझ्या शिक्षणासाठी अविरत कष्ट केले असे माझे आई-बाबा आणि इतर नातेवाईक यांचे प्रोत्साहन मिळाले नसते तर ही प्रबंधिका मी पूर्णत्वास नेऊ शकले नसते. अशा माझ्या कुटुंबियांचे ऋण मी कधीही विसरु शकणार नाही.

**सोने वनश्री बाळासो**